# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

## परीक्षा विभाग

**Website: ycmou.digitaluniversity.ac**

**E-mail - covid19cell@ycmou.digitaluniversity.ac**

**शैक्षणिक वर्ष 2019-2020 च्या अंतिम वर्षाच्या/सत्राच्या परीक्षांबाबत सूचना**

**प्रात्यक्षिक परीक्षा** - 15 ते 30 सप्टेंबर 2020
**लेखी परीक्षा** - 5 ऑक्टोबर 2020 ते 30 ऑक्टोबर 2020
निकाल जाहीर करण्याची प्रक्रिया 31 ऑक्टोबर 2020 पासून

## प्रात्यक्षिक परीक्षांबाबत सूचना -

- पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमांच्या अंतिम वर्षातील/सत्रातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाद्वारे घेण्यात येत असलेल्या प्रात्यक्षिक परीक्षा या मार्च 2020 पर्यंत संबंधित विषयांचे नियमीत झालेले प्रात्यक्षिके, जर्नल, टर्मवर्क, अंतर्गत मौखिक परीक्षा, प्रकल्प, स्टुडिओ, विद्यार्थ्यांची एकूण उपस्थिती अथवा अभ्यासक्रमात नमूद तत्सम तरतुदी या आधारे घेतल्या जातील.
- विद्यार्थ्यांशी ऑनलाईन माध्यमातून/दूरध्वनी/ईमेल याद्वारे संपर्क करून प्रात्यक्षिकावर आधारित मौखिक परीक्षा घेतल्या जातील.
- ज्या अभ्यासक्रमांतर्गत मौखिक परीक्षा किंवा प्रकल्प (प्रोजेक्ट) अहवालावर आधारीत मौखिक परीक्षा असतील त्यांचे मूल्यमापन विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष न बोलविता दूरध्वनीद्वारे मुलाखत, स्काईप किंवा इतर ऑनलाईन माध्यमांद्वारे होईल.
- ज्या विद्यार्थ्यांचे प्रकल्प अहवाल जमा झालेले नसतील त्यांचे सॉफ्टकॉपीच्या स्वरूपातील अहवालांचे, अभ्यासक्रमातील नमूद आराखड्याप्रमाणे मूल्यमापन करण्यात येईल.
- ज्या पूर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांनी विहित कालावधीत प्रात्यक्षिक परीक्षेसाठी परीक्षा अर्ज भरून विद्यापीठाकडे पाठविले असतील अशा विद्यार्थ्यांना या परीक्षेस प्रविष्ठ होता येईल.
- विद्यार्थ्यांना अभ्यासकेंद्राकडून प्रात्यक्षिक परीक्षांचे नियोजन ऑनलाईन किंवा टेलिफोनिक, ईमेलद्वारे कळवतील.

## लेखी परीक्षांबाबत सूचना

- अंतिम वर्ष/अंतिम सत्राच्या नियमीत विद्यार्थ्यांच्या परीक्षा या मार्च 2020 पर्यंत शैक्षणिक कार्य झालेल्या अभ्यासक्रमावर आधारित होईल.

- लेखी परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (वेबसाईट) प्रसिध्द केले जाईल.
- लेखी परीक्षा बहुपर्यायी (MCQs- Multiple Choice Questions) प्रश्न ह्या स्वरूपाची राहणार असून ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जातील.
- अंतिम वर्ष/सत्र विद्यार्थ्यांच्या बॅकलॉग (एटीकेटी) अभ्यासक्रमाच्या परीक्षादेखील बहुपर्यायी (MCQs- Multiple Choice Questions) प्रश्न ह्या स्वरूपाची राहणार असून ऑनलाईन पध्दतीने घेतल्या जातील.
- कोणत्याही कारणास्तव जे विद्यार्थी परीक्षा देऊ शकणार नाहीत, त्यांच्यासाठी एक संधी उपलब्ध करून दिली जाईल व त्यासाठी स्वतंत्र परीक्षांचे आयोजन या परीक्षांची प्रक्रिया पूर्ण झाल्यानतंर करण्यात येईल.

- **परीक्षांसाठीचा पॅटर्न पुढीलप्रमाणे असेल.**

| | | | |
|---|---|---|---|
| एकूण 50 पैकी 30 प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राह्य धरण्यात येतील. | कालावधी 60 मिनिटे | प्रत्येक उत्तरासाठी दोन गुण | एकूण 60 गुण |

- सदर 60 गुणांचे रूपांतरण विद्यापीठ गुण (UA) 80 गुणांमध्ये करण्यात येऊन त्यात अंतर्गत (CA) चे 20 पैकी गुण मिळवून एकूण 100 पैकी गुण दिले जातील.
- व्यावसायिक व अव्यावसायिक या अंतर्गत असलेल्या शिक्षणक्रमाच्या अंतिम वर्ष/सत्रातील नियमीत व फक्त अंतिम वर्ष/सत्राच्या बॅकलॉगसह (एटीकेटी) विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने होणार आहेत. यासाठी लागणाऱ्या लॅपटॉप, डेस्कटॉप वुईथ वेब कॅमेरा, स्मार्टफोन इत्यादी साधनांची व्यवस्था विद्यार्थ्यांने स्वतः करावयाची आहे. तसेच संपूर्ण परीक्षा कालावधीत वरीलपैकी कोणत्याही उपकरणांचा विद्यार्थी वापर करू शकतो.
- ऑनलाईन परीक्षा विद्यार्थ्यांने वरील कोणत्याही उपकरणाद्वारे स्वतःच्या घरून अथवा, जेथे इंटरनेट उपलब्ध असेल अशा सुरक्षित ठिकाणाहून द्यावयाची आहे.
- दिव्यांग विद्यार्थ्यांना नियमाप्रमाणे सोयी सवलती दिल्या जातील.
- बहुपर्यायी (MCQs) परीक्षांसाठी फोटोकॉपी व पुर्नमूल्यांकनाची सुविधा उपलब्ध राहणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
- ऑनलाईन परीक्षेत तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्यांना सॉफ्टवेअरमार्फत वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही जतन (Save) होऊन खंड पडला तेथून परीक्षा पुन्हा सुरू होईल.
- ऑनलाईन परीक्षा पध्दतीची इतर तांत्रिक माहिती स्वतंत्रपणे विद्यापीठाच्या वेबसाईटद्वारे कळविण्यात येईल.

- ऑनलाईन परीक्षेचा सराव व्हावा याकरिता सराव परीक्षांचे आयोजन (**Mock Test/Practice Test)** मुख्य परीक्षेपूर्वी करण्यात येईल.
- परीक्षेबाबत विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणी व शंकांचे निराकरण करण्यासाठी उपरोक्त ईमेलद्वारे संपर्क करावा.
- कोविड-19 या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे वरील सर्व तरतुदी या फक्त शैक्षणिक वर्ष 2019-2020 साठीच लागू असतील.

सदर परीक्षांच्या आयोजनापूर्वी व परीक्षा कालावधीत येणाऱ्या अडचणी व शंकांचे निरसन करण्यासाठी संबंधित विभागीय केंद्रांशी (अभ्यासकेंद्र/विद्यार्थी ज्या विभागीय केंद्रांतर्गत असेल) संपर्क साधावा. संपर्कासाठी सर्व विभागीय केंद्रांवर शिक्षणक्रमनिहाय नियुक्त केलेल्या सहकार्यांचा तपशिल विद्यापीठाच्या संकेतस्थळावर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येईल.

परीक्षा नियंत्रक (प्र)

प्रत माहितीसाठी व उचित कार्यवाहीसाठी
**सर्व विभागीय संचालक, वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार** - (कृपया वरील सूचना आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अभ्यासकेंद्र व विद्यार्थी यांना अवगत करावयात)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक ज्ञानगंगा घरोघरी